**इयत्ता 11, 12 वी मध्ये खालील त्रुटी असणारे विद्यार्थी प्रवेशास अपात्र ठरतील.**

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळा व्यतिरिक्त दुसऱ्या मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण पण इंग्रजी विषय, घेतले नसल्यास अपात्र ठरेल.

ब) इ. 11 वी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण विद्यार्थी , दोन किंवा दोन पेक्षा जास्त खंड असलेला विद्यार्थी अपात्र (फक्त एक वर्षाचा खंड चालेल)

क) आय.टी.आय./ शेतकी शाळा नियमित वर्गांना 2015-16 मध्ये प्रवेश घेतलेला विद्यार्थी अपात्र असेल.

**इयत्ता 12 वी विज्ञान**

अ) इ. 11 वी कला, वाणिज्य, किमान कौशल्य, उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र असेल.

**इयत्ता 12 वी वाणिज्य**

अ) इ. 11 वील कला, किमान कौशल्य उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र असेल.

**इयत्ता 12 वी कला**

अ) इ. 11 वी किमान कौशल्य उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र
इ. 12 वी मधील कोणत्याही शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी अपात्र
इ. 12 वी नापास व दोन किंवा दोन पेक्षा जास्त खंड असणारे.

अ) विद्यार्थी अपात्र (फक्त नापास विद्यार्थ्यांचा एका वर्षाचा खंड चालेल.) अन्य महाविद्यालयातील इ. 11 वी वाणिज्य व विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास अपात्र राहील.

ब) दुसऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या टी.सी. च्या पाठीमागे मा. शिक्षणाधिकाऱ्यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

क) टी.सी. च्या दुय्यम प्रतीवर प्रवेश देण्यासाठी पोलीस स्टेशनच्या एफ.आय. आर. ची प्रत व हमी पत्राची प्रत आवश्यक आहे.

ड) बाहेरच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यास प्रवेश देताना त्याची पटपडताळणी झाल्याची मा. प्राचार्याचे पत्र आवश्यक आहे.



विशाल मनाचे शेकडो स्त्री-पुरुष भोगविलास आणि सुखाच्या इच्छेपासून दूर होऊन तन, मन, धनाने त्या कोट्यावधी भारतीयांच्या कल्याणासाठी प्रयत्न करतील जे दारिद्र्य आणि अज्ञानाच्या खाईत खितपत पडलेले आहेत तेंव्हाच खऱ्या अर्थाने भारत जागृत होईल.



भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई
माहिती पुस्तिका
२०१६ -१७

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी बंधु - भगिनी

दहावी /अकरावी वर्गाच्या परीक्षेमध्ये तुम्ही मिळविलेल्या यशाबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

पुढील शिक्षणासाठी आपण या महाविद्यालयात प्रवेश घेत आहात, आपले मन:पूर्वक स्वागत. या महाविद्यालयात उच्च माध्यमिक स्तरावर कला, वाणिज्य, विज्ञान शाखेबरोबरच संगणकशास्त्र अभ्यासक्रम ही उपलब्ध आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र अभ्यासक्रमास रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे. हे व्यवस्थितपणे समजून घेऊनच विद्याशाखेची आणि विविध विषयांची योग्य निवड करणे गरजेचे असते.

आई - वडील, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अन्य जाणकार व्यक्तींचे मार्गदर्शन घ्या. त्याचबरोबर आपली स्वत:ची आवड विचारात घेऊन योग्य विद्याशाखेची व विषयांची निवड करण्याची ही काळजी घेतली म्हणजे आपले भविष्य उज्ज्वल असेल, यात संशय नाही.

खोलेश्वर महाविद्यालय हे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था द्वारा संचालित एक संस्कार केंद्र आहे. भा.शि.प्र. संस्थेची स्थापना जून, 1951 साली झाली. मराठवाडा विभागामध्ये संस्थेची शाळा महाविद्यालये अशी, एकूण 36 संस्कार केंद्र आहेत. या विशाल परिवाराचे आपण घटक आहोत, याचे जाणीव आपण ठेवली पाहिजे.



मानवाला ज्ञान द्या - त्याला पवित्र आणि अध्यात्मिक सामर्थ्याने संपन्न करा आणि शिक्षित बनवा. तेंव्हाच या जगातून दु:खाचा शेवट होईल,अन्यथा नाही.

**'केल्याने होत आहे रे । आधि केलेचि पाहिजे।'** अर्थात-जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे' हे बोध वाक्य संस्थेने स्वीकारले आणि शिक्षणक्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून संस्कारीत व सुजाण युवा पिढी घडविण्याचे पवित्र व महत्त्वाचे कार्य आपली संस्था अथकपणे करीत आहे. म्हणूनच भा.शि.प्र. संस्थेचा समाजमनावर एक वेगळा ठसा उमटलेला दिसून येतो.

खोलेश्वर महाविद्यालय, जून 1972 ला स्थापन झाले. तेंव्हापासून या महाविद्यालयाने गुणवत्ता, अनुशासन आणि शिस्तीची एक वैभवशाली परंपरा निर्माण केली आहे. ''राष्ट्र निर्माणासाठी माणूस घडविणे आणि चारित्र्य निर्माण करणे हेच शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे.'' स्वामी विवेकानंदाच्या विचारानूसार हे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्नरत आहे. त्यासाठी नियमित अध्ययन -अध्यापन आणि मूल्यमापन कार्याबरोबरच विविध मंडळे आणि उपक्रमांची रचना केली आहे.

आपण या उपक्रममांमध्ये सहभाग घ्यावा, व्यायामशाळा, ग्रंथालय, संगणक विभाग, सुसज्ज प्रयोगशाळा, क्रीडा विभाग इत्यादी सुविधांचा योग्य उपयोग करावा, आपले निर्धारित ध्येय साध्य करावे. आजच्या ज्ञानाधिष्ठित समाजाचा एक सक्षम घटक म्हणून आपण सिद्ध व्हावे यासाठी आपल्या भावी शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

**डॉ. मु.अ. देवर्षी**
प्राचार्य



त्यागाचा अर्थ आहे स्वार्थाचा संपूर्ण अभाव. पूर्णतेच्या प्राप्तीसाठी त्याग हेच एकमेव साधन आहे.





**शिक्षक पालक योजना**

आपल्या महाविद्यालयामध्ये **शिक्षक पालक योजना** राबविल्या जाते. एका शिक्षकाकडे साधारणपणे 40 ते 50 विद्यार्थ्यांचे पालकत्व दिल्या जाते. विद्यार्थ्यांचे पालकत्व ज्या शिक्षकाकडे आहे, त्यांच्याकडे आपल्या अडचणी, प्रश्न, समस्या, सूचना, मांडाव्यात, याचे निश्चितपणे निराकरण केले जाईल.

विद्यार्थ्यांनी आपले **शिक्षक** पालक म्हणून कोणते **शिक्षक** आहेत हे जाणून घ्यावे, त्यासाठी शिक्षक पालक योजना प्रमुख, पर्यवेक्षक, उपप्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

**अभ्यासेत्तर उपक्रम** : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांच्यातील सुप्त गुणांना चालना मिळावी म्हणून खालील मंडळाची रचना करण्यात आलेली आहे. आपल्या आवडीनूसार विद्यार्थ्यांनी खालील मंडळामध्ये सहभाग घ्यावा.

1) **बलोपासक मंडळ:** यामध्ये विद्यार्थ्यांना टेबल टेनिस, कब्बडी, खो-खो, हॉलीबॉल, उंच उडी, लांब उडी, थाळा फेक, भालाफेक, कराटे, 100, 200, 500, 1000 मीटर धावणे, रोप मल्लखांब, इत्यादी खेळ प्रकारामध्ये सहभागी होता येऊ शकते. यासाठी विद्यार्थ्यांनी क्रीडा शिक्षक, पर्यवेक्षक, उपप्राचार्य यांच्याशी संपर्क ठेवावा.

2) **कलोपासक मंडळ** : यामध्ये, विविध कला गुण दर्शनामध्ये (उदा. रांगोळी स्पर्धा, गीत गायन, नृत्य, इ.) सहभागी होता येते.

3) **ज्ञानोपासक मंडळ :** यामध्ये वाद-विवाद, वक्तृत्व, निबंध, काव्यवाचन, कथा लेखन, इ. स्पर्धा वर्षभरात होत असतात.

4) **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :** यामध्ये 'गांधी विचार संस्कार परीक्षा', 'विज्ञान मंडळ 'आयोजित स्पर्धा परीक्षा, 'ऑलम्पियाड परीक्षा', घेण्यात येतात.

यासाठी विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. दि. ना. मुडेगांवकर, प्रा. ह. व. देशमुख, प्रा. अ. सु. जाधव मॅडम, प्रा. प्र. प्र. जोशी , प्रा. प्र. बा. तावरे प्रा. चिटणीस, प्रा. गोस्वामीयांच्या संपर्कात राहावे.



आपल्यात कोणत्याही प्रकारचा दुराग्रह असता कामा नये, कारण दुराग्रह प्रेमाचा विरोधक आहे.

अभ्यासक्रमाचा कालावधी दोन ते तीन महिने

माध्यम : इंग्रजी (कांही अभयासक्रमासाठी मराठी)

दिलेल्या KLIC कोर्सेसपैकी कोणतेही 4 कोर्स पूर्ण केले तर KLIC Diploma मिळतो.

**अकरावी / बारावी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या तासाव्यतिरिक्त रिकाम्या वेळेत हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो.**

प्रवेशासाठी अधिक माहिती खालील प्राध्यापक देतील त्यांच्याशी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| उपप्राचार्य | : | श्री डबीर सु. कृ. |
| संगणकशास्त्र विभाग | : | श्री तोडेवाले सु. वि. |
| संगणकशास्त्र विभाग | : | श्री वैद्य आर. पी. |

**MKCL**च्या क्लिक कोर्सेसमधून विद्यार्थांना करियर उपयोगी कौशल्य शिकता येणार आहेत.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचालित

**श्रीमती पार्वतीबाई महादेव अभ्यंकर मुलींचे वस्तीगृह**
**व**
**कमवत्या महिलांचे वस्तीगृह अंबाजोगाई**

अशी खास विद्यार्थीनीसाठी संपूर्ण सुविधासह उपलब्ध आहेत.

संपर्क : ऑफीस : (02446) 246931
अधिक्षक : 9420022335



ज्या समाजात आपला जन्म झाला आहे, त्याचे आदर्श आणि व्यवहरांना अनुरुप असे उद्दात आणि प्रगत कार्य करणे हेच आपले कर्तव्य आहे.





# विद्यार्थ्यांसाठी आचार संहिता

- विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयाच्या विहित वेळेतच महाविद्यालयात उपस्थित राहावे.
- महाविद्यालयात होणाऱ्या सर्व तासिकांच्या हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करावी.
- महाविद्यालयात दिलेले वर्गपाठ व गृहपाठ वेळेवर पूर्ण करावेत.
- पर्यावरण प्रकल्प वही वेळेत दाखल करावी.
- महाविद्यालयात होणाऱ्या घटक चाचणी, सत्र परीक्षा, सराव परीक्षांना उपस्थित राहावे.
- दररोज गणवेशातच महाविद्यालयात उपस्थित राहावे.
- परिसरात गुटखा, तंबाखु सेवन करु नये. जर असे दिसून आले तर कडक कार्यवाही करण्यात येईल.
- महाविद्यालय परिसरात **भ्रमणभाष संच (मोबाईल)**आणू नये. आवश्यकता भासल्यास प्राध्यापकांशी संपर्क साधावा.
- महाविद्यालयीन शिस्तीचे वेळोवेळी पालन करावे.
- **महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी / विद्यार्थिनींचे उत्पीडन (रँगीग) करताना आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करुन प्रवेश रद्द केला जाईल.**
- विद्यार्थ्यांनी सर्व परीक्षा (घ.चाचणी, प्रथमसत्र, व्दितीय घ.चाचणी,व्दितीयसत्र, सरावपरीक्षा, तोंडी परीक्षा) देणे बंधनकारक आहे परीक्षा न दिल्यास दंड भरावा लागेल.

**प्रवेशासाठीची कागदपत्रे खाली दर्शविल्याप्रमाणे लावावी .**

1) शुल्क विवरण
2) प्रवेश अर्ज
3) गुणपत्रक (दहावी / अकरावी ) (तीन सत्य प्रती)
4) मूळ टी. सी. व तीन सत्य प्रती
5) आधार कार्डाची सत्यप्रत व रक्तगट तपासणीचे प्रपत्र सत्यप्रत
6) पटपडताळणी प्रमाणपत्र (फक्त 12 वी साठी)
7) शुल्क माफीचा (सवलतीचा ) अर्ज
8) शुल्क भरलेली पावती / पावत्या जपून ठेवाव्यात, त्यावर आय.डी. क्र. आहे.



ज्या संयमाने इच्छाशक्तीचा प्रवाह आणि विकास नियंत्रणात आणला जातो आणि जो लाभदायी असतो, त्याला शिक्षण म्हणतात.

# कनिष्ठ महाविद्यालय

**कनिष्ठ महाविद्यालयात खालील वर्गांसाठी प्रवेश दिला जातो.**




सर्व वर्गांसाठी प्रवेशाची शेवटची तारीख 1 ऑगस्ट असते.

**आम आदमी विमा योजना :**

इ. 11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो . त्यासाठी 1 हेक्टर (2.5 एकर) बागायती व 2 हेक्टर (5 एकर) कोरडवाहु शेती असणारे विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील. त्यांनी या योजनेचे प्र-पत्र श्रीमती नारायणकर मॅडम यांच्याकडून घेऊन त्या प्रपत्रावर आपल्या गावच्या तलाठ्याकडून सही , शिक्क्यासह अर्ज पूर्ण भरुन कार्यालयात जमा करावा. जे विद्यार्थी वरील प्रपत्र भरणार नाहीत, त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

या संदर्भान्वये इ. 11 वी व 12 वी साठीचे प्रवेश **अपात्र** ठरविण्यात आले आहेत.



ईश्वराने भारताला नेहमीच दात्याच्या उच्च आसनावर बसवले आहे. भारतवासी जगाचे धर्मगुरु राहिले आहेत. ते दुसऱ्याच्या धनाला लुटणारे रक्त पिपासू राक्षस नव्हते, त्यामुळे मला माझ्या पूर्वजांचा अभिमान वाटतो.





# ज्ञानयुगातील नवी करियर्स

शैक्षणिक वर्ष 2016-17 साठी महाराष्ट्र ज्ञान मंडळाचा (MKCL) KLIC Course (Knowledqe Lit Careers) अभ्यासक्रम खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय अंबाजोगाई येथे अधिकृत अध्ययन केंद्र म्हणून मंजूर झालेला आहे.

अकरावी /बारावी कला वाणिज्य व विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी खालील अभ्यासक्रम करता येतात.

**Business Management**
Office Assistant
Tour Planner
Advanced Excel
Presentation Pesigning

**Accounts**
Financial Accounting
With tally ERP

**Audio Video Editing**
2 D Animation

**Web Designing**
Web Designing

**Compoter Programming**
'C' programming
C++ programming
Scratch Programming

**Hardware & Networking**
It Hardware Support
It Network Support
It Security Support

**Creative Design**
Graphic Design
Content Illustration
Stationary Designing
DTP (Coraldraw)
Photo Editing
DTP (Adobe)



ज्या संयमाने इच्छाशक्तीचा प्रवाह आणि विकास नियंत्रणात आणला जातो आणि जो लाभदायी असतो, त्याला शिक्षण म्हणतात.

4) पर्यावरणशास्त्र

पर्यावरणशास्त्र या विषयाची विषय प्रकल्पवही घेऊन प्रथमसत्रामध्ये एक प्रकल्प 30 गुणांचा व सेमिनार किंवा जर्नल्स 20 गुणांचा व द्वितीय सत्रामध्ये 30 गुणांचा एक प्रकल्प व सेमिनार किंवा जर्नल्स 20 गुणांचा पर्यावरणशास्त्र **प्रकल्पवहीमध्ये लिहावा. विषय प्रकल्प, जर्नल्स अथवा सेमिनार विषय शिक्षकांच्या** मार्गदर्शनाखाली पूर्ण करुन त्यांच्याकडे द्वितीयसत्रा अखेर प्रकल्प वही जमा करावी. जर पर्यावरण विषय प्रकल्पाची वही विषय शिक्षकाकडे जमा केली नाही तर आपला निकाल अनुत्तीर्ण (नापास) असा असेल, याची नोंद घ्यावी.

5) **आरोग्य व शारिरीक शिक्षण**

आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाची प्रथमसत्रामध्ये एक 25 गुणांची लेखी परीक्षा व 25 गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच द्वितीय सत्रामध्ये एक 25 गुणांची लेखी व 25 गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा होईल. जर या परीक्षा विद्यार्थ्यांनी दिल्या नाहीत तर त्याचा परिणाम निकालावर होवू शकतो.

या विषयाची पुस्तके ग्रंथालयातून मिळू शकतील, तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसाठी संबंधित क्रीडा शिक्षक मार्गदर्शन करतील.

**बलोपासक मंडळाच्या माध्यमातून विविध मैदानी खेळ :** टेबल टेनिस, कुस्ती, कब्बडी, खो- खो, लांब उडी, धावणे, कराटे स्पर्धा, रोप मल्ल खांब स्पर्धा वर्षभरामध्ये होत असतात. त्यामध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा.



अहंकार आणि माया हे पूर्व कुसंस्काराचे फळ आहे. या व्यक्तित्वाचा जेवढा त्याग तेवढाच आत्मा आपल्या नित्य स्वरुपात, आपल्या पूर्ण महिम्यात अभिव्यक्त होतो.





## • इ. ११ वी (नियमित) प्रवेशाच्या वेळी आवश्यक कागदपत्रे

1) **विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज व खालील पैकी एक अर्ज , शुल्क माफीसाठी भरणे आवश्यक आहे.**

2) **इ.बी.सी. (खुल्या प्रवर्गातील फक्त मुलांसाठी)**

इ.बी.सी. ची सवलत मिळविण्यासाठीचा अर्ज व त्यावर विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या प्रमाणपत्रावर सरपंच / विशेष न्याय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक आहे.

3) **कुटुंब मर्यादा प्रतिज्ञापत्र** - दोन प्रतीत (फक्त खुल्या प्रवर्गातील मुलींसाठी)

4) **प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यासाठी**
(मुलगा व मुलगी )
शुल्क माफीचा अर्ज दोन प्रतीत त्यावर वडील / पालक ज्या माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नोकरी करतात तेथील मुख्याध्यापक / प्राचार्यांची स्वाक्षरी असावी.

5) मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थिनीसाठी शिष्यवृत्ती अर्ज पूर्ण भरुन कार्यालयात श्रीमती नारायणकर मॅडम यांच्याकडे जमा करावा.

6) ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी आम आदमी विमा योजना
(एक हेक्टर बागायत जमीन / 2 हेक्टर कोरडवाहू जमीन)



एकाग्रता सर्व ज्ञानाचे सार आहेच. जेव्हा मन एकाग्र होत व मागे वळून स्वत:वरच केंद्रीत होते तेंव्हा आपल्या आतमध्ये जे काही आहे ते आपले मालक न राहता गुलाम होते.

## • इ. ११ वी ए.टी.के.टी. (फक्त कला शाखा) प्रवेशाच्या वेळी आवश्यक कागदपत्रे

1) मार्च 2016 मध्ये किमान दोन विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रवेश दिला जाईल.

2) ए.टी. के.टी. प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज मिळतो तो भरावा.

3) किमान दोन विषयात अनुत्तीर्ण (नापास) झालेल्या गुणपत्रकाच्या 3 सत्यप्रती

4) शाळेतील मूळ बोनाफाईड + 3 सत्यप्रती

5) आधार कार्डाची सत्यप्रत व रक्तगट तपासणीचे प्रपत्र सत्यप्रत

**नोट** : इ. 10 वी उत्तीर्ण झाल्यानंतर मूळ टी. सी . + 3 सत्यप्रती उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक हे कागदपत्र कार्यालयात ताबडतोब दाखल करावे. अन्यथा अकरावीचा निकाल जाहीर करता येत नाही.

## इ. १२ वी प्रवेशाबाबत कागदपत्रे

1) महाविद्यालयाचा विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज

2) दहावी गुणपत्रकाच्या दोन छायांकित प्रती

3) 11 वी च्या गुणपत्रकाच्या तीन छायांकित सत्यप्रती (मूळ गुणपत्रक देऊ नये.)

4) जर विद्यार्थी बाहेरील महाविद्यालयातून या महाविद्यालयात प्रवेशित होत असेल तरच मूळ टी. सी. व त्याच्या तीन छायांकित सत्यप्रती आणाव्यात.

5) जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत,

6) पट पडताळणी झाल्याचे प्रमाणपत्र आणावे.

7) आधार कार्डाची सत्यप्रत व रक्तगट तपासणीचे प्रपत्र सत्यप्रत



खरे शिक्षण तेच आहे ज्यामुळे माणसाच्या मानसिक शक्तीचा विकास होतो.





## विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची माहिती व सूचना

**1) विषय प्रकल्प : 20 गुण**

विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या वह्या पूर्ण करुन संबंधित विषय शिक्षकाकडे विहीत वेळेत द्याव्यात. विषय प्रकल्प असणारे विषय पुढील प्रमाणे – **रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, वाणिज्य संघटन, पुस्तपालन लेखाकर्म** इ. विषयाच्या प्रकल्प वह्या द्वितीय सत्रापूर्वी विषय शिक्षकाकडे जमा नाही केल्यास त्या विषय प्रकल्पाचे गुण विद्यार्थ्यास मिळणार नाहीत, त्याचा परिणाम त्या विषयाच्या निकालावर घेऊ शकतो, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**2) तोंडी (मौखिक) परीक्षा : 20 गुणांची**

विद्यार्थ्यांनी पुढील भाषा विषयाची मौखिक (तोंडी ) परीक्षा / द्वितीय / वार्षिक परीक्षे अखेर देणे अनिवार्य आहे. तोंडी परीक्षा असणारे विषय **इंग्रजी, मराठी, हिंदी, पाली, संस्कृत** इ. आहेत. या भाषा विषयाची तोंडी परीक्षेस अनुपस्थित राहिल्यास त्याचे गुण विद्यार्थ्यास मिळणार नाहीत. व त्याचा परिणाम निकालावर होऊ शकतो, याची नोंद सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावी.

**3) प्रात्यक्षिक परीक्षा 30/20 गुण**

**भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, संगणक, गृहविज्ञान, संगीत , संरक्षण** या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे. जर या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा दिली नाही तर त्या विषयाचे गुण मिळणार नाहीत, व त्याचा निकालावर परिणाम होऊ शकतो, याची नोंद घ्यावी.



माणूस होणे हेच आमच्या जीवनाचे उद्दिष्ट असायला हवे . तीच आपली एकमेव साधना आहे.

## कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची नावे

### भाषा विभाग

| | |
|---|---|
| प्रा. तिवारी श्री. श्री. | इंग्रजी |
| प्रा . खडके सुं. दि. | इंग्रजी |
| डॉ. मुडेगांवकर दि. ना. | संस्कृत |
| प्रा. तावरे प्र.बा. | मराठी |
| प्रा. पवार प.खे. | हिंदी |
| प्रा. खंडेकर सं. ब. | पाली |

### सामाजिक शास्त्र विभाग

| | |
|---|---|
| प्रा. सुरवसे ज्ञा. ना. | अर्थशास्त्र |
| प्रा. हेडे ना.श्री . | अर्थशास्त्र |
| प्रा. कावळे जि. रे. | राज्यशास्त्र |
| प्रा. चिटणीस का. म. | इतिहास |
| प्रा. कलमे आ. भा. | अन्नशास्त्र / वस्त्रशास्त्र |
| प्रा. देशमुख ह. व. | समाजशास्त्र |
| प्रा. पुराणिक शै.म. | संगीत |

### विज्ञान विभाग

| | |
|---|---|
| प्रा. डबीर सु.कृ. | भौतिकशास्त्र |
| प्रा. बारडकर शा.पु. | रसायनशास्त्र |
| प्रा. जोशी प्र. प्र. | जीवशास्त्र |
| प्रा. सौ. जाधव अ. सु. | रसायनशास्त्र |
| प्रा. देशमुख अं. न. | भौतिकशास्त्र |

### वाणिज्य विभाग

प्रा. पाठक आ. चं.

प्रा. गोस्वामी द. चिं.



नि:स्वार्थ कर्माच्या मदतीने मानवी जीवनातील सर्वोच्च ध्येय असलेली मुक्ती मिळवणे हाच कर्मयोग आहे.





## कला शाखा

### विषयाची निवड

1) इंग्रजी

2) पर्यावरण

3) आरोग्य व शारिरीक शिक्षण

**द्वितीय भाषा : मराठी / हिंदी / संस्कृत / पाली (या पैकी) एक**

पर्यायातील विषयापैकी कोणतेही चार विषय निवडावेत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| समाजशास्त्र | / | संगीत - 1 | | |
| अर्थशास्त्र | / | संगीत - 2 | | |
| राज्यशास्त्र | / | इतिहास | | |
| संरक्षणशास्त्र | / | अन्नशास्त्र | / | वस्त्रशास्त्र |

### महत्त्व ओळखपत्राचे

महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक. ओळखपत्रावर स्वत:चे नांव, वर्ग, इ. स. आणि स्वत:चे छायाचित्र आवश्यक, ते प्रमाणित केलेले पाहिजे. ओळखपत्र ग्रंथालयातून मिळते. महाविद्यालयात ते रोज आपणाजवळ असणे अनिवार्य आहे.

ओळखपत्र ग्रंथालयातून प्रवेश पूर्ण झाल्यावर घ्यावे. 1 ऑगस्ट पासून ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येता येणार नाही.



सुख आणि दु:ख दोघेही महान शिक्षक आहेत आणि जेवढे ज्ञान त्याला सुखाकडून मिळते तेवढेच दु:खाकडून मिळत असते.

# विज्ञान शाखा

## 'अ' गट

## वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखा

| | |
|---|---|
| **आवश्यक विषय :** | इंग्रजी |
| | पर्यावरण |
| | आरोग्य व शारीरिक शिक्षण |
| **द्वितीय भाषा :** | मराठी / हिंदी / संस्कृत (पैकी एक) |
| **ऐच्छिक विषय** | 1) भौतिक शास्त्र |
| | 2) रसायन शास्त्र |
| | 3) जीवशास्त्र |
| | 4) गणित |

## 'ब' गट

## फक्त वैद्यकीय शाखा

| | |
|---|---|
| **आवश्यक विषय :** | इंग्रजी |
| | पर्यावरण |
| | आरोग्य व शारीरिक शिक्षण |
| **द्वितीय भाषा :** | मराठी / हिंदी / संस्कृत (पैकी एक) |
| **ऐच्छिक विषय** | 1) भौतिक शास्त्र |
| | 2) रसायन शास्त्र |
| | 3) जीवशास्त्र |
| | 4) समाज शास्त्र |



भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई
माहिती पुस्तिका
२०१६ -१७

# विविध पारितोषिके

1) **कै. मनोहरशास्त्री जोशी पारितोषिक**

हे पारितोषिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या 12 वी परीक्षेत **संस्कृत** विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

2) **कै. सुलोचना देशपांडे पारितोषिक**

हे पारितोषिक 12 वी कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेमध्ये मंडळ परीक्षेत महाविद्यालयात **संस्कृत**विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

3) **कै. धनंजय गद्रे पारितोषिक**

हे पारितोषिक 12 वी कला, वाणिज्य, विज्ञान मध्ये मंडळ परीक्षेत महाविद्यालयात **इंग्रजी** विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

4) **कै. लक्ष्मीकांत रंगनाथ जोशी पारितोषिक**

हे पारितोषिक 12 वीं मंडळ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या **अधिकोषण** विषय घेतलेल्याविद्यार्थ्यास दिले जाते.

5) **कै. झुंबरलाल नाईक वांजरखेडकर पारितोषिक**

हे पारितोषिक 12 वी कला, वाणिज्य, विज्ञान मध्ये मंडळ परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख 120/- रुपयाचे पारितोषिक दिले जाते.

6) **कै. सुमित्रा भालचंद्र जोशी पारितोषिक**

हे पारितोषिक 11 वी कला, वाणिज्य, विज्ञान मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यामध्ये शालांत परीक्षेत सर्वात जास्त गुण आहेत त्यास दिले.

तसेच विषय निहाय प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शनही मिळते. विद्यार्थी व पालक प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक यांच्याशी सहज संपर्क साधून मार्गदर्शन घेऊ शकतात.

**वर्गातील तासिकांना व परीक्षेस (पूर्व परवागनी शिवाय) अनुपस्थित राहिल्यास नियमानूसार दंड आकारण्यात येईल.**

टीप : विद्यार्थ्यांच्या पालकांनी (आई, वडील, काका, मामा, इत्यादी) आपल्या पाल्याविषयी महिन्यातून किमान एक वेळ विषय शिक्षक, पर्यवेक्षक, उपप्राचार्य यांच्याशी प्रत्यक्ष वा भ्रमणध्वनीद्वारे चौकशी करावी.

## शुल्क विवरण

| शुल्क प्रकार | 11 वी | | | 12 वी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान |
| संस्था संबंधित/ इ.बी.सी. मुलींची / सवलत माध्यमिक शिक्षक / प्राथमिक शिक्षक/माजी सैनिक | 200/- | 310/- | 400/- | 250/- | 350/- | 450/- |
| शिष्यवृत्ती धारक | 100/- | 250/- | 300/- | 200/- | 300/- | 350/ |
| पूर्ण फी धारक | 420/- | 520/- | 600/- | 500/- | 600/- | 700- |



धर्मांध अधिक कार्य करू शकत नाही तो आपल्या शक्तीच्या तीन चतुर्थांश भाग व्यर्थ नष्ट करतो.





**'क' गट**

## अभियांत्रिकी शाखा

| | | |
|---|---|---|
| **आवश्यक विषय :** | इंग्रजी<br>पर्यावरण<br>आरोग्य व शारीरिक शिक्षण | |
| **द्वितीय भाषा :** | द्वितीय भाषा नाही. | |
| **ऐच्छिक विषय** | 1) भौतिकशास्त्र<br>2) रसायनशास्त्र<br>3) गणित<br>4) संगणकशास्त्र I, II | |

शै. वर्ष 2011-12 पासून 'लेखी ' परीक्षेमध्ये 25 % गुण उत्तीर्णतेसाठी आवश्यक आहेत.

**निवडलेला गट** ☐

**'आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे.'**

### महत्त्वाची सूचना

10 वी चा टी. सी., व मार्क मेमो आपणास अनेकवेळा आवश्यक असतात व मूळ टी. सी., मेमो महाविद्यालयात दिल्यावर ते परत मिळत नाहीत , म्हणून या कागदपत्रांच्या अधिक प्रती काढून स्वत:जवळ ठेवाव्यात.



शरीराच्या माध्यमातून शक्तीचा लहान सहान प्रमाणात होणाऱ्या अभिव्यक्तीला कार्य म्हणतात.

# वाणिज्य शाखा

**आवश्यक विषय :** इंग्रजी
पर्यावरण
आरोग्य व शारीरिक शिक्षण

**द्वितीय भाषा :** मराठी / हिंदी / संस्कृत (यापैकी एक)

**ऐच्छिक विषय :**
1) पुस्तपालन लेखाकर्म (मराठी व इंग्रजी माध्यम)
2) सचिवाची कार्यपध्दती
3) अर्थशास्त्र
4) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

**'पाली'** : वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यासाठी व्दितीय भाषा **पाली** विषय घ्यावयाचा असेल तर उपप्राचार्य **सु. कृ. डबीर,** पर्यवेक्षक **प्रा. तावरे प्र. बा., प्रा. सं. ब. खांडेकर** यांच्याशी संपर्क करावा.

## योग्यता प्रमाणपत्र

10 वी बोर्ड किंवा 11 वी परीक्षा महाराष्ट्राबाहेरुन किंवा नवोदय विद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यिमाक शिक्षण मंडळ औरंगाबाद यांच्याकडे योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सर्व मूळ कागदपत्रासह आवेदनपत्र पाठवावे लागते. हे आवेदन पत्र न भरल्यास एच. एस. सी. बोर्ड दंड तर आकारतेच व निकाल ही जाहीर करत नाही. हे आवेदन पत्र शुल्कासह कार्यालयात 31 ऑगस्ट पर्यत दाखल करावे. उशिरा आवेदन पत्र भरल्यास म. रा. मा. उ. मा. शिक्षण मंडळाकडून आकारला जाणारा सर्व दंड विद्यार्थ्यास भरावा लागेल व होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.



मुक्तीचा अर्थ आहे पूर्ण स्वातंत्र्य, शुभ आणि अशुभ अशा दोन्ही प्रकारच्या बंधनातून मुक्त होणे.





## महाविद्यालयीन परीक्षा संभाव्य वेळापत्रक
## शैक्षणिक वर्ष 2016-17

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या नियमानुसार इ. 11 वी व इ. 12 वी च्या परीक्षा वर्षभरात घेतल्या जातात, त्याचे संभावित वेळापत्रक खालील प्रमाणे.

### प्रथम सत्र

1) सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये इ. 11 वी व इ. 12 वी ची (25 गुणांची ) 'प्रथम घटक चाचणी परीक्षा' घेण्यात येईल.

2) 'प्रथम सत्र परीक्षा' ऑक्टोबर / नोव्हेंबर महिन्यामध्ये (प्रथमसत्र अखेर) घेण्यात येईल.

### द्वितीय सत्र

1) द्वितीय सत्रामध्ये इ. 11 वी व इ. 12 वी साठी (25 गुणांची) 'द्वितीय घटक चाचणी परीक्षा ' डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये घेण्यात येईल.

2) इ. 12 वी साठी एक सराव परीक्षा जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये घेण्यात येईल.

3) इ. 11 वी साठीची वार्षिक परीक्षा मार्च महिन्यामध्ये घेण्यात येईल. (सर्व विषयासाठी 20 % प्रथम सत्रातील भागावर/घटकावर प्रश्न विचारले जातील.)

(प्रथम घटक चाचणी, प्रथम सत्र, द्वितीय घटक चाचणी , सराव परीक्षा, वार्षिक परीक्षा) या परीक्षांमध्ये विषयश: गुणवंत विद्यार्थ्यांची नांवे सूचनाफलकावर लावल्या जातात, व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीसही देण्यात येते.



शरीराच्या माध्यमातून शक्तीचा लहान सहान प्रमाणात होणाऱ्या अभिव्यक्तीला कार्य म्हणतात.